## बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर
### माहिती कक्ष, दिनांक २१ ऑक्टोबर २०१८
## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरां. व कलम** | : | ६३९/२०१८ भादविसक ५०६(२),५०४ भाहकाक ४/२५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १९/१०/२०१८ रोजी २०.३० वा अंबिका नगर बाळे येथील घरी सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/१०/२०१८ रोजी ०४.४१ वा |
| **फिर्यादी** | : | सौ.मंदा माणिक वाघमारे वय-३५ रा.संभाजी गुंड यांच्या घरात भाड्याने अंबिका नगर बार्शी रोड बाळे सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | ०१.माणिक मोहन वाघमारे रा.सदर |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे पती नमुद आरोपी याने फिर्यादीचे वडील नामे मल्लारी बाबु देडे हे घरी आल्यानंतर त्यांना शिवीगाळ करून तुझ्या मुलीचे हॉटेल मालक लमाण यांच्या सोबत संबंध आहेत तु मुलीची भाड खातो असे म्हणल्यावर फिर्यादीने आरोपी यास तुम्ही असे का बोलता म्हणाले असता फिर्यादीस घाणघाण शिवीगाळ करून तुझे बाहेर संबंध आहेत असे संशय घेवुन घरातील लपवुन ठेवलेले गवत कापण्याचे लोखंडी धारदार हत्यार हातात घेवुन तुला मारतो असे धमकी देवुन फिर्यादीस मारणेकरीता अंगावर आले असता मुलगा नामे श्रीकांत व वडिल नामे मल्लारी यांनी पळत येवुन त्याच्या हातातील हत्यार हातातुन काढुन घेतले नंतर तो घरातुन पळुन गेला म्हणुन **तपास :- पोह/३६८ मोरे** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरां. व कलम** | : | ७३६/२०१८ भादविसक ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १९/१०/२०१८ रोजी ००.३० वा गुरू किराणा दुकान शामानगर झोप.पट्टी सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/१०/२०१८ रोजी १३.१० वा |
| **फिर्यादी** | : | चंद्रकांत बंदगेप्पा वाघमारे वय-२६ रा.शास्त्री नगर झोपमोदीखाना घर.नं.१३९ सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | ०१.अजय रघुनाथ जाधव रा.शामा नगर झोप.सोलापूर ०२.अमोल रघुनाथ जाधव रा.सदर ०३.रघुनाथ जाधव रा.सदर |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील नमुद |

| | | |
|---|---|---|
| | | फिर्यादी हा फिर्यादीचे भाऊ नामे सुरेश यास जेवणेसाठी बोलविण्यास गेले असता आ.क्रं.०१ याने फिर्यादीस तुझे तु जा की त्याला कशाला घेवुन चालला असे म्हणुन शिवीगाळ केली तेव्हा फिर्यादी त्यास कशाला शिव्या देतो असे म्हणाला असता आ.क्रं.०१ याने फिर्यादीस शिवीगाळ करून हाताने मारहाण करण्यास सुरूवात केली ती पाहता त्याचें वडील आ.क्रं.०३ व भाऊ आ.क्रं.२ यांनी हातात दोन बाबूंची लाकडे घेवुन येवुन फिर्यादीस शिवीगाळ करून बांबुचे लाकडाने फिर्यादीस तोंडावर,पाठीवर.हातापायावर व डोक्यास मारहाण करून त्यास फिर्यादीस जखमी केले म्हणुन **तपास :- पोना/३७३ चव्हाण** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरां. व कलम** | : | ५९४/२०१८ भादविसक ३२४,३२३,५०४,३४ मपोकाक १३५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ .ठिकाण** | : | १९/१०/२०१८ रोजी २०.०० वा फिर्यादीच्या राहते घरासमोर सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/१०/२०१८ रोजी ०३.५८ वा |
| **फिर्यादी** | : | सहदेव दुर्गाप्पा हत्तीकट्टी वय-५४ रा.सी २५ सिध्देश्वर नगर नविन आरटीओ ऑफिस जवळ वि.रोड सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | ०१. मयुर महादेव सोनकांबळे रा.आदित्य नगर वि.रोड सोलापूर |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील नमुद आरोपी मजकुर याने मागील झालेल्या तक्रारीचा राग मनात धरून फिर्यादीस घाणघाण शिवीगाळ करून फिर्यादीची पत्नी नामे महादेवी व मुलगी नामे नर्मता हिस धक्काबुक्की करून त्याने सोबत आणलेल्या लोखंडी कु-हाडीने फिर्यादीच्या डोक्यात दोन वेळा मारून फिऱ्यादीस जखमी करून दुखापत करून फिर्यादीचे कुटूंबाला जीवे मारण्याची धमकी देवुन पळुन गेला म्हणुन **तपास :- पोना/८७ कांबळे** |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरां. व कलम** | : | ६४३/२०१८ भा.ह.का.क.३/२५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ .ठिकाण** | : | २०/१०/२०१८ रोजी १०.३० वा पंचकट्टा ते विजापूर वेस जाणा-या रस्त्यावरील सांळुखे स्टील दुकानाच्या समोर सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/१०/२०१८ रोजी १७.४१ वा |
| **फिर्यादी** | : | पोशि/१३११ भाऊसाहेब धनाजी बाबर वय-३२ ने.फौजदार चावडी पोलीस ठाणे |
| **आरोपीचे नांव** | : | ०१. महेश सुरेश गुरूभेट्टी वय-२५ रा.कुमठेगाव ते सोरेगांव च्या विटभट्टीजवळ कुमठे सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **मिळाला माल** | : | १२,५३,०००/-रू देशी पिस्टल देशी बनावटी बुलेट,चारचाकी गाडी वं.एमएच-१३-सीएस-०२७७ |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील नमुद आरोपी याने आपल्या कब्जात नमुद वर्णानचे व किंमतीचे देशी पिस्टल व बुलेट(गोळ्या) बेकायदा,बिगर परवाना जवळ बाळगलेल्या परिस्थीतीत मिळुन आला म्हणुन **तपास :- पोसई/गोडसे** |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरां. व कलम** | : | ४६३/२०१८ वै.व्य.अधि.१९६१ चे क.३३ व ३६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २०/१०/२०१८ रोजी १५.३० वा डॉ.नित्यानंद दवाखाना नावाचे क्लीनिक अ.कोट रोड पाण्याच्या टाकीजवळ आंध्रा बँकेसमोर सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/१०/२०१८ रोजी २३.१७ वा |
| **फिर्यादी** | : | डॉ.जगदीश कृष्णाराव काळे वय-६४ व्यवसाय-वैद्यकीय अधिकारी अधि.सोलापूर महानगरपालिका सोलापूर रा.अ-२ काडादी नगर होटगी रोड सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | ०१.बोगस डॉ.नामे गुरूदास निताई विश्वास वय-३८ रा.प्लॉट नं.९ आंबल रेसीडेन्सी गांधीनगर गोंधळेवस्ती शेजारी गांधळेवस्ती देवी मंदीराच्या बाजुला सोलापूर |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील आरोपी याची वैद्यकीय व्यावसायाकरीता लागणारी शैक्षणिय अहर्ता धारण करत नसल्याने व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी नसल्याची तसेच गावी शैक्षणिय पात्रता नसताना बेकायदेशीर पणे डॉक्टर उपाधी लावुन वैद्यकीय व्यवसाय करित असताना मिळुन आला म्हणुन **तपास :- पोसई/दांडगे** |